जा.क्र. कोजिप/शिक्षण/प्राथ/तं.मु.शाळा/2026
शिक्षण विभाग (प्राथ./माध्य.), जि.प. कोल्हापूर,
दिनांक- 18/06/2026.

प्रति,

1) गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती पंचायत (सर्व)
2) प्रशासन अधिकारी, मनपा. कोल्हापूर
3) मुख्याध्यापक माध्यमिक शाळा (सर्व)

विषय :- मित्र उपक्रमाची अंमलबजावणी करणेबाबत.

संदर्भ : 1. मा. संचालक राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे, यांचे पत्र जा. क्र. राशैसंप्रपम कला व क्रीडा / मित्र उपक्रम प्रशिक्षण/सन २०२६-२७/दिनांक ११/०५/२०२६..
2. मा.शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर विभाग कोल्हापूर यांचेकडील पत्र जा. क्र१९२५१७७/४७८० दिनांक २९ मे,२०२६
3.प्राचार्य जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था कोल्हापूर यांचेकडील पत्र दिनांक 03/०६/२०२६

उपरोक्त विषय व संदर्भीय परिपत्रक क्र. १ नुसार शालेय .शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन व विपश्यना विशोधन संस्था, इगतपुरी यांच्या संयुक्त विद्यमाने मित्र (MITRA-Mind In Training for Awareness) उपक्रम (आनापान साधना वर्ग) राज्यातील सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळांतून सुरु करण्याबाबत आदेश देण्यात आले आहेत. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन परिपत्रक क्र संक्रीण २०११/२९६/११) माशि-३ मंत्रालय, मुंबई ४०००३२ दिनांक २७ जानेवारी २०१२ नुसार जिल्हास्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. सदरचा मित्र उपक्रम कार्यक्रम राज्यातील सर्व इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मानसिक व बौद्धिक वाढीकरिता उपयुक्त ठरणार आहे.

यानुसार उपरोक्त मित्र उपक्रमांतर्गत ज्या शिक्षकांनी १० दिवसाच्या विपश्यना अभ्यासक्रम पूर्ण केलेला नाही. त्यांना ३ तासाचे आनापान प्रशिक्षण व ज्या शिक्षकांनी १० दिवसाच्या अभ्यासक्रम पूर्ण केला आहे त्यांना ६ दिवसाचे प्रशिक्षण घेणे आवश्यक आहे.तरी आपल्या गटातील संबधीत शाळा मुख्याध्यापक /शिक्षक यांना अवगत आपलेस्तरावरुन अवगत करावे.

(टिप :- यापूर्वी मित्र उपक्रमाचे प्रशिक्षण ज्यांचे पूर्ण आहे, (संबंधित शिक्षकांनी) त्यांनी शाळांमध्ये आनापान प्रशिक्षण घेणेचे आहे.)

(सुवर्णा सावंत)
शिक्षणाधिकारी (माध्य.)
जिल्हा परिषद कोल्हापूर

प्रत माहितीस्तव सविनय सादर-
1.मा.मुख्य कार्यकारी अधिकारी सा ो , जिल्हा परिष्द कोल्हापूर
2.मा.प्राचार्य जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था कोल्हापूर.

C:\Users\acer\Desktop\Letter Tobacco.doc

Scanned with OKEN Scanner